14 JUL 2010

क्र. टिआरजी/चार/लिपीक संवर्ग प्रशिक्षण/२०१०/3107 मुंबई, दि. /७/२०१०

संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक क्र. टिआरजी/चार/लिपीक संवर्ग प्रशिक्षण/२०१०/१९८२, दि. ५/५/२०१०.

**विषय : पोलीस विभागातील कार्यालयीन कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत प्रशिक्षण आयोजित करण्याबाबत.**

०००

पोलीस विभागातील कार्यालयीन कर्मचाऱ्यांना सेवेत रुजू झाल्यानंतर सेवांतर्गत प्रशिक्षण देण्यासाठी वरील संदर्भीत परिपत्रकान्वये सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात आले आहे, त्यासोबत सेवांतर्गत प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम व तपशिल देण्यात आलेला आहे.

सदर अभ्यासक्रमात कार्यालयीन कार्यपध्दती हा विषय अंतर्भूत आहे. सदरच्या विषयावर मा. श्री एस. मजिदुल्हा, तेंव्हाचे पोलीस महानिरीक्षक यांनी कार्यालयीन कार्यपध्दती यावर इंग्रजीमध्ये नियमपुस्तिका तयार केली होती. सदर इंग्रजी नियमपुस्तिकेच्या आधारे, ती नियमपुस्तिका समजेल अशा मराठी भाषेत पोलीस महासंचालक कार्यालयातील श्री आनंद ओरोसकर, पोलीस महानिरीक्षक यांचे उपसहाय्यक (आस्था-२) यांनी अनुवादीत / भाषांतरीत केली आहे.

सदरची पुस्तीका निशुल्क उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, पोलीस महासंचालक यांच्या वेबसाईटवर www.mahapolice.gov.in/the book corner या वेब लिंकवर जावून सदरची पुस्तीका डाऊनलोड करून अभ्यासक्रमातील कार्यालयीन कार्यपध्दती हे विषय शिकवतांना या पुस्तकाचा उपयोग करण्यांत यावा.

Maadhava 13/7/10

(डॉ. माधव सानप)

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके

महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (रेल्वेसह)

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक

प्रत,

सर्व पोलीस अधिक्षक (रेल्वेसह)

प्रत सविनय सादर,

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

E:\3-5-2010 clerical inservice training.doc